# हट्ट

धरण फुटून कोंडलेलं पाणी जसं धो धो आवाज करीत वेगाने वाहू लागावं तसा पाऊस बाहेर एकदम कोसळू लागतो. अन् माझं लिहिण्यातलं चित्त उडतं.

तसं लिहिण्यात फारसं मन नसतंच. थोडी फार सुरुवात करणं, पान दोन पानं काहीतरी खरडणं, नंतर नापसंतीनं त्याचे बोळे करून फेकणं असं केव्हापासून चाललेलं असतं. सुचलेली कथाच मुळी मनाला पटलेली नसते. अवास्तव वाटते.

पण तिचा नादही सुटत नाही. कारण कुठेतरी मनाला ती स्पर्शून गेलेली असते. कथेच्या नायिकेबद्दल कुठंतरी कोपऱ्यात सहानुभाव उत्पन्न झालेला असतो. तिची व्यथा वाचकांसमोर मांडून तिला न्याय द्यावासा वाटतो.... पण मन तयार नसतं. त्याला 'ती' वेडी वाटते, मूर्ख वाटते.

बोटांना चिकटलेलं कोळ्याचं जाळं सोडवायला जाताना ते बोटांना अधिकाधिक चिकटत जावं तसं ह्या कथेनं मांडलं होतं. त्यामुळे मनःताप अधिक वाढत होता, वैताग येत होता, मस्तक तापत होतं.... कागदाचे बोळे करणं वाढत होतं.

अन् तेवढ्यात बाहेर पाऊस कोसळू लागतो. मला सुटल्यासारखं होतं अन् मी पेन बंद करून टेबलापासून दूर होतो. खिडकीशी जाऊन उभा राहतो.

भर दुपारी तिन्हीसांज झाल्यासारखं वाटत असतं. अंगणात एवढ्यात पावलांच्या वर पाणी साचलं असतं अन् त्यावर धारांचं नृत्य सुरू असतं. समोरच्या मध्यम उंचीच्या पारिजातकाला पाऊस एखाद्या मांत्रिकासारखा झोडपत असतो अन् आडव्यातिडव्या वाहणाऱ्या वाऱ्यानं तोही अंगात आल्याप्रमाणे स्वतःला घुसळत असतो, लवलवत असतो. समोरच्या गॅरेजच्या पत्र्यावर ताशा ताडताड वाजत असतो अन् त्याला पावसाच्या घनगंभीर नादाची साथ चालू असते. सारं चराचर वेगानं कोसळणाऱ्या धारांनी न्हाऊन निघत असतं, धुंद झालेलं असतं.

पावसाच्या पाण्याचा एक तुषार चेहऱ्यावर येतो तसं माझं शरीर थरथरतं. मी भानावर येतो. क्षणापूर्वी आलेली मरगळ, वैताग आता कुठच्या कुठे वाहून गेलेला असतो. वातावरणातील धुंदी माझ्याही मनावर चढते. काही लिहिण्याचा

विचार केव्हाच मागे पडलेला असतो. अन् त्या धुवांधार पावसात फिरावयास जाण्याची जबरदस्त लहर मनाचा ताबा घेते. आलेली उबळ मला दाबता येत नाही.

त्या अनावर उबळीसरशी मी अंगातील शर्टपायजम्यावरच रेनकोट चढवितो, पायात पावसाळी बूट घालतो अन् डोक्यावर हॅट ठेवत दारात येतो. सौ.ला तिथूनच बाहेर जात असल्याची सूचना देत, तिच्या कुरबुरीकडे लक्ष न देता अंगणात पाय ठेवतो.

अंगणात साचलेल्या पाण्यात मी क्षणभर उभा राहतो अन् तेवढ्यात शॉवरबाथखाली उभा असल्याप्रमाणे माझ्या अंगावरून पाणी निथळू लागतं. हॅटवर पाण्याचे थेंब मोहरी फुटल्याप्रमाणे तडतडू लागतात. थंडगार वाऱ्याचा एक झोत अंगावरून वाहून जातो अन् अनामिक उल्हासानं शरीरातील कण न् कण उत्तेजित होऊन उठतो. उघड्या अंगानं पावसात नाचणाऱ्या मुलांप्रमाणे मनाची वृत्ती बनते अन् त्या आवेगात मी भरभर अंगण ओलांडून रस्त्यावर येतो.

रस्त्यावर चहाच्या रंगाचं पाणी एखाद्या ओढ्यासारखं वाहात असतं. आता ते जवळ जवळ अर्ध्या गुडघ्याएवढं वाढलेलं असतं अन् त्यातून पादचाऱ्यांची अन् वाहनांची तुरळक रहदारी चालू असते. अचानक पावसाची सर कोसळल्यामुळे वाटेवरील दुकानांच्या वळचणीच्या आश्रयाला गेलेले लोक रस्त्यावरील प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाणाऱ्या पादचाऱ्यांची नि सायकलस्वारांची त्रेधातिरपिट पहात स्वत:ची करमणूक करीत असतात. मधूनच वर आभाळाकडे पाहून पाऊस थांबण्याच्या वेळेचा अंदाज घेत असतात, त्याविषयी बोलत असतात. मधुनच एखादी मोटार पाणी उडवीत वेगाने निघून जाते. एखाद्या दुकानातील रेडिओ मोठमोठ्यानं वाजत असतो.

पाण्यातून पाय ओढत मी चालू लागतो. पाण्याची ओढ पायांना जाणवत असते. वरून पाऊस कोसळतच असतो अन् अशा परिस्थितीतही आपण आतून कोरडे असतो, इतर वेळी कधीच न जाणवणारी शरीराची स्वाभाविक ऊब अशा सर्द वातावरणात आतून जाणवत असते. किंचित सुखद वाटते. त्या अर्धवट, अस्पष्ट कथेच्या विचारांतून पूर्णपणे मुक्त होऊन मनाच्या एका संतृप्त अवस्थेत रमतगमत मी चालत राहतो.

अन् मला सिगरेट ओढण्याची तलफ येते. चौकावरच्या पानाच्या दुकानासमोर मी थांबतो. सिगरेटचं पाकीट विकत घेऊन त्यातील एक सिगरेट

ओठात ठेवत पाकीट खिशात घालतो. पानाच्या दुकानातील काड्याची पेटी घेऊन सिगरेट पेटवितो अन् एक जोराचा झुरका घेऊन धूर हवेत सोडतो. तशा कुंद हवेत वर वर जाणाऱ्या धुम्रवलयांकडे बघत सहज विचारतो, ''क्यौ पंडितजी! इस साल पानी कैसा रहा ?''

''क्या जानत सरकार ! पर जवार का तो सत्यानाश हो जायगा ! भगवान की मर्जी !'' तो पान लावू लागतो.

मी काळजीनं वर पाहतो. काळवंडलेल्या आभाळातून धुरकटलेला प्रकाश झिरपत असतो. अन् पखालीतून पाणी ओतल्यासारखं पावसाच्या धारा इमारतीच्या छपरांवर, झाडांवर, विजेच्या खांबावर, तारांवर, रस्त्यातून जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांवर, पादचाऱ्यांवर पाणी ओतत असतात. हवेतील ओलावा वाढत असतो. ती अधिकाधिक दमट, कुंद होत असते. मधूनच वारा पावसाला आडवातिडवा झोडपत असतो. धारांना तिरपी दिशा देतो. रस्त्यावरील वाहणाऱ्या पाण्याचा वेग, पातळी वाढत असते.

सिगरेटचे झुरके घेत मी पावसाचा विचार करीत पुढे चालू लागतो. पण तो फार वेळ टिकत नाही. समोरून पावसात भिजत येणाऱ्या तरुण स्त्रीकडे माझं लक्ष जातं.

पावसानं ओलं झाल्यामुळं अंगाला जागोजागी चिकटलेलं नऊवारी पातळ, किंचित विस्कटलेले केस, ओघळलेलं कुंकू अन् लोकांच्या नजरा चुकविण्यासाठी नजर खाली करून झपझप चालणं....

तीसुद्धा नऊवारीच नेसत असते. तिला आपण साडीतसुद्धा कधी पाहिलेलं नसतं. मग इतर फॅशन्स तर दूरच. गौरवर्णाच्या अन् चवळीसारख्या शेलाट्या बांध्याच्या देहाला नऊवारी पातळ खरोखरच खुलत असतं. उंच कपाळ, सरळ नासिका, निमुळती जिवणी, शुभ्र दंतपंक्तीतून विलसणारं प्रफुल्ल स्मित, निर्व्याज डोळे अन् कमरेच्याही खाली पोहोचणारा केशसंभार - साधी राहूनही ती आकर्षकच दिसते. अन् म्हणूनच कदाचित तो तिच्यावर मोहित झाला असावा. माझ्या मनात परत ती शिरलेली असते अन् त्या तंद्रीत पाय नेतील तिकडे मी चालत राहतो. तितक्यात मागून खांद्यावर थाप पडते. मी दचकून मागे वळून पाहतो.

किडकिडीत शरीराचा मुकुंदा मिस्किलपणे हसत उभा असतो. छत्रीच्या मुठीवरील पंजाला दुसऱ्या हाताचा पंजा जोडत नमस्कार केल्यासारखं करीत तो

म्हणतो.

"काय लेखक ! चिंतन वगैरे चाललं होतं वाटतं. मघापासून हाका मारतोय !" त्याचं हास्य अधिकच रूंदावतं.

आपण ओशाळं हसून काहीतरी बोलतो. निरर्थक. नंतर तो चहाचं विचारतो. आपल्यालाही मग तलफ येते. समोरच्याच हॉटेलमध्ये आम्ही दोघंही शिरतो अन् समोरच्याच टेबलावर बसतो. तिथून रस्त्यावरची शोभा दिसत असते. पावसाचा जोर किंचित कमी झालेला असतो. कडक चहाची ऑर्डर देऊन मुकुंदा सिगरेटचं पाकीट पुढे करतो. मी सिगरेट घेतल्यावर स्वत: एक ओठात धरतो अन् काडी उजळून माझ्यासमोर धरीत विचारतो –

"हं ! काही नवीन लेखन वगैरे ? एखादी कथा ?" सिगरेट ज्योतीवर पेटवून तिचा एक लांब झुरका घेत मी उत्तरतो –

"काही विशेष नाही..... एक कथानक मात्र घोळतं आहे मनात.... पण अस्पष्ट."

स्वत:ची सिगरेट पेटविल्यावर काडी जोरानं हालवून विझवत मुकुंदा विचारतो, उत्सुकतेनं –

"साधारणत: कल्पना कशी आहे ? मध्यवर्ती कल्पना !" अन् विझवलेली काडी तो बोटांनी दूर उडवितो.

रस्त्यावरून गेलेल्या मोटारकडे बघत मी अर्धवट स्वगत बोलतो "थोडा पेच पडलाय !"

"पेच ?" मुकुंदाच्या स्वरात कुतूहल !

"हं !" मी हुंकारतो. वेटर चहाचे कप ठेवून निघून जातो. कपातून वर निघणाऱ्या वाफेकडे पाहात मी अचानक विचारतो, "मुकुंदा ! विवाहापूर्वीच प्रियकराशी शरीरसंबंध घडला तर एखादी तरूणी काय करील ?"

"त्यांचे प्रेमप्रकरण कुठवर आलंय ह्यावर ते अवलंबून राहील." मुकुंदा प्रेमप्रकरण ह्या शब्दावर जोर देऊन किंचित हसत म्हणतो.

"अंऽहं ! तसं प्रकरण वगैरे काही नसतं." चुटकीनं सिगरेटची राख झाडत मी म्हणतो.

"साधं बाळबोध प्रेमप्रकरण समज ना तू !".... ती कॉलेजमध्ये एम.ए.ला असते. हा डॉक्टर असतो. दूरच्या नात्यानं घरी येणं जाणं आधीपासून असतं अन् सहवासानं हळूहळू ओळखीचं रूपांतर प्रेमात होतं. दोन्ही घरांची

त्यांच्या ह्या प्रेमाला संमती असते. लग्नही ठरलं असतं पण मुहूर्त लांबणीवर पडलेला असतो. व्यवसायाची नीट घडी बसेपर्यंत तो लग्नाला तयार नसतो.''

मी चहाचा घोट घेऊ लागतो. मुकुंदा एकवार खांदे उडवितो. मग सिगरेटचा खोल झुरका मारत म्हणतो –

''हे पहा ! ह्या शरीरसंबंधातून काही विपरीत उत्पन्न होणार असल्याची तिला शंका आली तर ती लवकरच लग्नाचा मुहूर्त धरण्याचा आग्रह धरील. तसे काही नसेल अन् ती जर अत्याधुनिक विचारांची तरुणी असेल तर विशेष काही वाटूनही घेणार नाही ती.'' मुकुंदा डोळे मिचकावित पुढे म्हणतो – ''ह्यापुढे फार तर ती विशेष काळजी घेईल. अशा संबंधातून पुढे काही उद्‌भवू नये ह्याची. इतकंच !'' तो सिगरेट फेकतो.

''ती आत्महत्या करते. लगेच. त्या प्रसंगानंतर !''

''हम्बग ! इम्पॉसिबल !''

''रीअली ! शी कमिटस् सुईसाइड !!''

''पण तसं करायला तिला कारणच काय ?'' मुकुंदाचं औत्सुक्य आता जागं झालेलं असतं. मी सांगू लागतो –

''कारण तिचा स्वभाव ! मतं ! विवाहासंबंधीची, संसाराबद्दलची, उदात्त प्रेमाची, स्त्रीदेहाच्या पावित्र्यासंबंधीची.....''

''जुनाट !''

''हो ! आजच्या आधुनिक काळात जुनाटच म्हटली पाहिजे....उदात्त प्रेमाची तिची काही कल्पना असते. शारीरिक आकर्षणाला, संबंधाला तिच्या मते त्यात गौण स्थान असतं.....''

''प्लेटॉनिक लव्ह वगैरेसारखं ?'' मुकुंदा मध्येच उपहासानं विचारतो.

''अगदी त्याच तऱ्हेचं नव्हे'' मी आता आवेशात येतो – ''पण कमीत कमी विवाहापूर्वी तरी असा संबंध घडू नये असं तिला वाटत असतं. लग्नाच्या मंडपात, अग्निनारायणाच्या साक्षीनं, आणाशपथा घेतल्यावर मग आपण आपल्या सर्वस्वाचं दान करावं अशी तिची इच्छा असते. तो आधी घडणारा संबंध तिला व्यभिचारासारखा घृणास्पद वाटत असतो. साध्या चुंबन, अलिंगनाला देखील म्हणूनच तिचा विरोध असतो.''

''जरा जगावेगळीच मतं वाटतात. नाही ?'' मुकुंदा मध्येच विचारतो.

''हो ना ! स्त्रीदेहाच्या पावित्र्याबद्दलच्या तिच्या कल्पना फार उच्च

असतात, उदात्त असतात. प्रत्यक्ष प्रियकरानं का होईना पण तो विवाहापूर्वी विटाळू नये अशी तिची अपेक्षा असते, आग्रह असतो. बाळबोध संस्कारात वाढलेली असल्यानं असेल कदाचित !'' मी थांबतो. सिगरेटचं थोटूक विझवून फेकतो.

वेटर रिकाम्या कपबशा घेऊन जायला आलेला असतो. तो निघून गेल्यावर एक नवीन सिगरेट मला देत नि आपण एक पेटवून मुकुंदा झुरके घेऊ लागतो. काही वेळानं मुद्दा सुचल्यासारखं एकदम विचारतो –

''पण ती कॉलेजमध्ये असते ना ? एम.ए. च्या टर्म्स भरत असते ना?'' त्याला काय म्हणायचं आहे हे मला कळतं.

''संस्कृत विषयात ती एम.ए. करीत असते. म्हणूनच कदाचित तिच्या ह्या आग्रहाला धार आली असावी. संस्कृत वाङमयाच्या अन् धार्मिक ग्रंथांच्या अभ्यासानं !.... म्हणजे शक्यता सांगतो मी'' माझा स्पष्टीकरणाचा प्रयत्न मलाच केविलवाणा वाटतो. मी त्याच्या चेहऱ्याकडे निरखून पाहतो.

त्याला काहीच पटत नसावं हे मला कळून येतं. पाऊस आणखी कमी झाल्यानं वाढलेली रस्त्यावरची वर्दळ निरखत आम्ही दोघंही मूक बसलेलो राहतो....

मग एकदम एक जोराचा झुरका घेत तोंडातून धूर ओकत मुकुंदा ठामपणानं बोलू लागतो –

''अप्पा ! ही कथा तू लिहू नकोस.''

''लिहू नको ?''

''नको ! कुणाला पटायची नाही. आतापर्यंत तुझी वास्तववादी लेखक म्हणून जी कीर्ती आहे तिला ही कथा धक्का लावील. साहित्याचे टीकाकार टीकेची झोड उठवतील. कथेला टोक नाही, आकृती नाही, वास्तवता नाही, ती फसली आहे वगैरे वगैरे व्यंग दाखवतील –''

''कारण ?''

''कारण आज विवाहाच्या बंधनाबद्दलचं जिथं वैचारिक बंड उभविच जात आहे, कुटुंबसंस्थेच्या उपयुक्ततेसंबंधी जेव्हा शंका प्रदर्शित केली जात आहे, विवाहाच्या संस्काराशिवाय जिथं आज तरुणतरुणी एकत्र राहू लागण्याची भाषा काढत आहेत अन् प्रेमाची व्याख्याच जिथं आता शारीरिक आकर्षणापुरती मर्यादित झाली आहे, तिथं तुझी ही कथा कुणाला पटणार ? वास्तववादी

वाटणार?''

"मला वाटतं हे सगळे विवाद विद्वान लोकांनी आपापसात माजवले आहेत. समाजात अजून असं काही ...''

" हे तू म्हणावसं ! प्रेमाच्या नावाखाली शरीराचा विक्रय मांडणाऱ्या आधुनिक तरुणी तू पाहिल्या नाहीस ? की लग्नमंडपात पाचसहा महिन्यांची गरोदर तरूणी नववधू म्हणून मिरवताना तू पाहिली नाहीस. शृंगारिक साहित्य वाचून नि अश्लील चित्रपट पाहून बहकलेली तरुणी तू पहिली नाही की आपल्या चुकीचे परिणाम धुऊन काढून पुन्हा वर मान करून जगणारी स्त्री तू पाहिली नाहीस ? मग अशा पार्श्वभूमीवर तुझ्या ह्या कथानायिकेची आत्महत्या वास्तविक वाटते ?'' मुकुंदा तीव्र नजरेनं माझ्याकडे पाहू लागतो.

"पण ती इतरांपेक्षा जरा वेगळीच आहे.'' मी आपलंच घोडं दामटायचा प्रयत्न करतो. पण इतक्यात तोच मला मध्ये तोडतो अन् विचारतो –

"मग अशा मुलीनं ह्या प्रेमाच्या फंदात पडावंच कशाला ?.... सरळ आपलं बाळबोध पद्धतीनं लग्न करायचं सोडून.... अन् काय रे ! तिच्या प्रियकरानं तिच्यावर बलात्कार केला असं तर तिला म्हणायचं नाही ना ?.... मग उगीच देखावा !'' अन् तो हाताची मूठ तोंडाशी नेऊन भराभर झुरके घेऊ लागतो. किलकिले डोळे करून माझ्याकडे पहात राहतो. त्याच्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्हामागचा मिष्किल भाव बदलत नाही.

मला काही उत्तर सुचत नाही. काही वेळ आम्ही दोघंही तसेच बसून राहतो. मूकपणे. आपल्या विचारात हरवून....

वेटर बिल पुढे ठेवतो तसे आम्ही भानावर येतो. चहाचे पैसे डिशमध्ये ठेवून उठतो अन् हॉटेलबाहेर पडतो. मुकुंदा माझा निरोप घेऊन निघून जातो. अन् मी रस्त्यानं परत चालू लागतो. पाऊस पुन्हा जोरात पडू लागतो.

माझी मोठी विचित्र अवस्था झाली असते. मूड गेलेला असतो. मुकुंदाचं म्हणणं मला एकीकडे पटत असतं तर दुसरीकडे सारखं वाटत असतं, कथानायिकेची व्यथा वाचकांसमोर मांडावी. तिची आत्महत्या मनाचा कुठला तरी कोपरा व्यापून राहिलेली असते. अन् म्हणूनच विचारांच्या ओढाताणीत मी मधल्यामध्ये फरफटल्या जात असतो. नकळत तलावावर येतो. काठावरील बगीच्यातील एका 'समरहाऊस' मध्ये बसतो. सिगरेट पेटवून तिचे झुरके घेत.... तलावाच्या पाण्यावर मुसळधार पावसाचे तांडवनृत्य बघत, हरवल्यासारखा !.....

....अन् धारांच्या धूसर पडद्यातून ती पुढे येते. नऊवारी पातळ नेसलेली, केसांची वेणी कमरेच्या खाली आलेली, अधोवदन नि व्यथित....

मी तिच्याकडे टक लावून पाहू लागतो. ती तशीच जमिनीवर नजर लावून उभी असते. बराच वेळ !.... मग अत्यंत हलक्या स्वरात पण भरल्या गळ्यानं ती विचारते. ''अप्पा ! मग काय ठरवलं तुम्ही ?... माझ्याबद्दल ?''

माझ्याकडून काहीच उत्तर येत नाही असं पाहून ती तोंड वर करते. माझ्या नजरेला नजर भिडवते. मी तोंड फिरवतो. व्यथित सुरात ती पुन्हा विचारते –

''माझी व्यथा तुम्ही वाचकांपर्यंत नाही पोहोचवणार ?''

मला तिची कीव येते. मी हताश स्वरात म्हणतो. ''कसं लिहू ? तू घेतलेला निर्णय कुणाला पटणार आहे? मुकुंदा शेवटी तुझ्याबद्दल काय म्हणाला ऐकलस ना ? विक्षिप्त, वेडी....''

''तो असंच म्हणणार आप्पा ! तोच काय, इतर अनेकसुद्धा असंच म्हणणार.... कारण त्यांना माझं मन, माझं दुःख कळलेलं नाही. मोठ्या श्रद्धेनं, संयमानं अन् पवित्र भावनेनं जे राखलं होतं ते मोहाच्या एका क्षणी लुटलं गेलं ह्याची जाणीव माझ्या मनाला कशा सहस्र इंगळ्या चावल्याप्रमाणे वेदना देते, ह्याची कल्पना त्यांना नसली तरी तुम्हाला आहे ना?''

मी होकारार्थी मान हलवतो.

''मग ?''

''मग काय ? तुझ्या दृष्टीकोनातून हे सगळं बरोबर असलं तरी मुकुंदासारखे इतर सर्वच हेच म्हणणार की हा सारा वेडगळपणाच आहे.... तो तुझा भावी पती आहे, त्यानं तुझ्यावर काही बलात्कार केलेला नाही, अन् तो लग्न करण्याचं अजून नाकारीत नाही. मग मोहाच्या एका क्षणी घडलेल्या एका गोष्टीचा एवढा बाऊ करून तू आत्महत्या करायला निघालीस.....'' माझ्या बोलण्यातून असमर्थता व्यक्त होत असते.

तिला हे सर्व असह्य होतं. खाली मान घालून ती तशीच उभी राहते. भावनावेगानं तिच्या डोळ्यातून अश्रूप्रवाह वाहू लागतो. नंतर शोकाचा आवेग थोडा कमी झाल्यावर ती पुन्हा चेहरा वर करते, म्हणते –

''आप्पा ! मुकुंदाचं म्हणणं बरोबर आहे. त्यांनी माझ्यावर जबरी केलेली नव्हती. झालं हे दोघांच्याही क्षणिक भावनेत झालं. पण ह्यात चूक

माझी नाही का ? माझा हा देह माझ्या श्रद्धेप्रमाणं अपवित्र होऊ नये याची काळजी मलाच नको का घ्यायला हवी होती ?.... पण मीच घसरले. कमकुवत ठरले. मनानं !.... शेवटी शारीरिक आकर्षणाचा जोर माझ्या श्रद्धेपेक्षा जास्त ठरला. हा देह विटाळला गेला.....

त्या घृणास्पद प्रसंगानंतर मला कळून आलं की ह्या शरीराला शेवटी फक्त एक पुरुषाचं शरीर हवं होतं अन् योगायोगानं ते ह्यावेळी भावी पतीचं होतं.... त्या प्रसंगी नि नंतर काही वेळ मी, जी एक धुंदी अनुभवली त्यात मी आजवर जपलेल्या उदात्त प्रेमाचा अंशही नव्हता....'' ती पुन्हा हुंदके देऊ लागली.

मी अस्वस्थ झालो. मला तिची कीव येत होती तरी मी तसाच बसून राहिलो. थोड्या वेळानं तिनं स्वतःला सावरलं अन् कसल्या तरी निश्चयानं, निर्धारानं ती म्हणाली –

''कुणी काहीही म्हणो ! पण आप्पा मी माझा निर्णय अंमलात आणणार! ह्या विटाळलेल्या देहाचं बंधन मी झुगारून देणार ! आता विवाहाच्या मंडपात अग्निनारायणाच्या सभोवती सात फेऱ्या मारण्यासाठी हा योग्य राहिला नाही. मग तुम्ही लिहा अगर न लिहून आपली कीर्ती सांभाळत रहा....''

अन् ती आली तशी पावसाच्या पडद्यात विरून जाते. मी तसाच बसून राहतो पाऊस उघडेपर्यंत. किंकर्तव्यमूढ होऊन.....

मग मी घरी परतण्यास निघतो अन् चालता चालता वाटेवरील सार्वजनिक वाचनालयासमोर येतो. सहज आत डोकावतो. सरावानं एक संध्याकाळचं दैनिक वाचू लागतो. अन् एक ठळक बातमी माझं लक्ष वेधून घेते – एका तरुणीची आत्महत्या....

मी जसंजसं अधिक वाचू लागतो तसंतसं मला वाटायला लागतं की ही जणू काही माझ्या कथानायिकेचीच कथा आहे –

अखेर तिनं आपला हट्ट वास्तवात उतरविलेला असतो !